01 AUG 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परीक्षा गैरप्रकारातील ३ हजार ४३६ विद्यार्थ्यांना शिक्षा

## शिवाजी विद्यापीठ परीक्षा प्रमाद समितीची कारवाई; हिवाळी सत्र ऑनलाईन परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या ऑक्टोबर हिवाळी सत्र ऑनलाईन परीक्षेत विद्यापीठ कार्यक्षेत्रात ३ हजार ५७३ कॉपीचे गैरप्रकार आढळून आले. विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाद समितीने यातील ३ हजार ४३६ विद्यार्थ्यांना शिक्षा सुनावली; तर १३७ जण निर्दोष सिद्ध झाले आहेत.



शिवाजी विद्यापीठाची परीक्षा पद्धती आणि वेळेत निकाल लावण्याच्या पद्धतीचे राज्य सरकारकडून यापूर्वी कौतुक झाले आहे. कोरोनापूर्वी विद्यापीठ परीक्षेदरम्यान एकाच दिवशी वेगवेगळ्या विषयांचे पेपर जाणे, प्रश्न व प्रिंटिंगमध्ये चुका आढळून आल्या आहेत. २०१९ मध्ये इंजिनिअरिंगच्या परीक्षेतील गुण वाढविण्याचे प्रकरण आणि शहरातील एका प्रतिष्ठित महाविद्यालयात विज्ञान शाखेचा पेपर फुटला होता. त्या प्रकरणातील संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली आहे. महाविद्यालयास दंड करण्यात आला आहे.

कोरोना काळात परीक्षेसाठी विद्यापीठाने नबीन कंपनी नियुक्त केली. तिच्याकडून ऑनलाईन परीक्षा घेण्यात आल्या. मात्र, या परीक्षेत पहिल्यांदाच प्रॉक्टरिंग पद्धतीचा अवलंब केला गेला. परिणामी, ऑफलाईनपेक्षा ऑनलाईन परीक्षा गैरप्रकारात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन तीन हजारांहून अधिक गैरमार्ग प्रकरणे आढळून आली. संबंधित विद्यार्थ्यांची विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाद समितीच्या वतीने चौकशी होऊन गैरप्रकाराच्या स्वरुपावरून शिक्षा सुनावण्यात आली आहे.

दोषी विद्यार्थ्यांची त्या विषयाची संपादणूक रद्द व एक हजार रुपये दंडाची कारवाई करण्यात आली आहे. सध्या विद्यापीठाच्या वतीने ७४१ अभ्यासक्रमांच्या उन्हाळी सत्र परीक्षा सुरू झाल्या आहेत. परीक्षेतील गैरमार्ग प्रकरणे परीक्षा प्रमाद समितीकडे येत आहेत. सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षेतील गैरप्रकाराची विषयनिहाय सुनावणी होऊन संबंधित विद्यार्थ्यांना शिक्षा सुनावली जाणार आहे.

### सांगली पेपरफुटी प्रकरण; दोषींवर कारवाई होणार

सांगली जिल्ह्यातील कुंडल येथील महाविद्यालयातील बी.एस्सी. सत्र-६ फिजिकल केमिस्ट्री पेपरफुटी प्रकरणाची विद्यापीठ परीक्षा प्रमाद समितीच्या वतीने चौकशी सुरू आहे. सोमवारनंतर या प्रकरणातील दोषींवर कारवाई निश्चित केली जाणार आहे. याकडे शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

### एम.ए. समाजशास्त्र प्रश्नपत्रिकेत चुका

विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेत एम.ए. समाजशास्त्र विषयाच्या प्रश्नपत्रिकेत चुका आढळून आल्या आहेत. याप्रकरणी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील वरिष्ठ पर्यवेक्षकांकडे लेखी तक्रार द्यावी. त्यांच्याकडून विद्यापीठ परीक्षा विभागास तक्रार पाठविली जाईल. विषय तज्ज्ञांकडून प्रश्नपत्रिकेतील चुकीच्या प्रश्नाची खातरजमा करून संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे.

तरूण भारत

# अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्राच्या वतीने अण्णा भाऊ साठे जयंतीदिनी सोमवार (दि. १) रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठातील शाहू सभागृहात व्याख्यानाचे आयोजन केले आहे. डॉ. राजेंद्र कुंभार, डॉ. शरद गायकवाड, शाहीर सदाशिव निकम हे वक्ते आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थान भूषवाणार आहेत, तरी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.